# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी
## समाज कल्याण विभाग

### जाहिर आवाहन

दिव्यांग व्यक्तीकरीता सन २०२३-२४ या वर्षात राबविण्यात येणा-या योजना, लाभार्थी संख्या, निश्चित केलेली रक्कम व इतर करावयाची कामे यांना दिनांक ०७/०६/२०२३ रोजी मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता प्राप्त झाली आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात समाज कल्याण विभागा अंतर्गत भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींना लाभ देणेकामी खालिलप्रमाणे योजना, लाभाचे स्वरुप व लाभार्थी संख्या निश्चित केली आहे.

| अ.क्र | योजना | लाभाचे स्वरुप | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण / उच्च शिक्षण तसेच दिव्यांग खेळाडुंकरीता (जिल्हास्तर/राज्यस्तर/ आंतरराष्ट्रीयस्तर) शिष्यवृती देणे. | **विद्यार्थ्यांचे शिक्षण स्तर**<br>इयत्ता १ ली ते १० वी-रु. ५,०००/- प्रती वर्ष<br>इयत्ता ११ वी ते १५ वी- रु. ८,०००/- प्रती वर्ष | <br>१०<br>५ |
| | | **खेळाडूंकरिता स्पर्धेचे स्तर**<br>जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर/आंतरराष्ट्रीयस्तर - १०,०००/- प्रती वर्ष | ४ |
| २ | दिव्यांगाना उत्पनाच्या अटींवर घरासाठी/घर दुरुस्ती करणेकामी अर्थसहाय्य देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु.५०,०००/- | १ |
| ३ | दिव्यांगाना व्यवसाय करण्याकरीता अर्थसहाय्य देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु.५०,०००/- | १० |
| ४ | दिव्यांगाच्या वैद्यकीय खर्चाकरीता अर्थसहाय्य देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु.२५,०००/- | २ |
| ५ | दिव्यांगांच्या बचत गटाना अर्थसहाय्य देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु. ६०,०००/- | २ |
| ६ | दिव्यांगांच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे | प्रती लाभार्थी रक्कम रु.५०,०००/- | १ |
| ७ | १८ वर्षावरिल दिव्यांगांना उदरनिर्वाह करीता अनुदान देणे. | प्रती लाभार्थी रक्कम रु.२०,०००/- | ५५ |
| ८ | १० वर्ष ते १८ वर्षा खालील दिव्यांगांना उदरनिर्वाह करीता अनुदान देणे. | प्रती लाभार्थी रक्कम रु. ५,०००/- | २० |
| ९ | ६० वर्षावरिल दिव्यांगांना उदरनिर्वाह करीता अनुदान देणे. | प्रती लाभार्थी रक्कम रु.२०,०००/- | १० |
| १० | कुष्ठरुग्णांना अनुदान देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु. २०,०००/- | ०५ |
| ११ | दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणीक साहीत्य / सहाय्यक उपकरणे खरेदीकामी अनुदान | प्रती लाभार्थी रु.२५,०००/- | ०६ |
| १२ | दिव्यांग व्यक्तींस सहाय्यक उपकरणे खरेदी करणेकामी अनुदान देणे. | प्रती लाभार्थी रु.२५,०००/- | ०२ |

वरिल योजनांकरीता नमुना अर्ज महानगरपालिकेच्या bncmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत. आवश्यक माहितीसाठी महानगरपालिका समाज कल्याण विभाग येथे संपर्क साधावा. सर्व वैयक्तीक योजनाकरीता लाभार्थ्याचे अर्ज दिनांक १९/०६/२०२३ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यत स्विकारण्यात येतील अथवा लाभार्थ्यांचे उदीष्ट पुर्ण झाल्यानंतर सदर योजनेचे अर्ज स्विकारणे बंद करण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रथम येणा-या अर्जदारास प्रथम प्राध्यान्य या तत्त्वावर मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांच्या मान्यतेने दिव्यांग व्यक्तींना लाभ देण्यात येतील. एका दिव्यांग व्यक्तीस वरीलपैकी कोणत्याही एकाच आर्थिक लाभाच्या योजनेचा लाभ घेता येईल. प्राप्त होणारे अर्ज स्विकारणे अथवा नाकारण्याचे संपुर्ण अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांना राहतील. तसेच या योजनांकरिता दरवर्षी दिव्यांग कल्याण करिता राखीव असलेली अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेऊन लाभार्थी संख्या व लाभाचे स्वरुप निश्चीत करण्यात येईल असे महानगरपालिकेच्या वतीने आवाहन करणेत येत आहे.

14/06/2023

प्र. उपआयुक्त (समाज कल्याण)
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका